महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग झालेल्या
शासकीय कर्मचा-यांना निवृत्तीवेतनाचे लाभ
मंजूर करण्यासाठी प्राधिकरणास सहायक
अनुदान (२२१५A०५२)
३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः बजेट-१४१९/प्र.क्र.६३/पापु-२३

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीखः २० ऑगस्ट, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः मजीप्रा- २०१४ / प्र.क्र.३३ (अ) / पापु-२३, दिनांक २३.३.२०१७.
२) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः मजीप्रा-१११७ / प्र.क्र.२३५ / पापु-२३, दिनांक १०.१.२०१९.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३,दिनांक १.४.२०१९
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८.७.२०१९
५) शासन निर्णय, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः बजेट-१४१९ / प्र.क्र.६३ / पापु-२३, दिनांक ११.७.२०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते तसेच निवृत्तीवेतनाचे दायित्व शासनाने दिनांक २३.३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये स्विकारले असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या निवृत्तीवेतनावरील खर्च अदा करण्यासाठी शासनाचे नियमित प्रधान लेखाशिर्ष २०७१ मधून कोषागारामार्फत प्रत्यक्ष निवृत्तीवेतन अदा होण्यासाठी बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्यामुळे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या सेवानिवृत्ती वेतनापोटी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता प्राधिकरणाला अनुदान देण्याच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात निर्माण करण्यात आलेल्या नवीन लेखाशीर्षास प्रधान महालेखाकार कार्यालयाच्या व वित्त विभागाच्या सहमतीने दिनांक १०.१.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सन २०१९-२० या वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. वित्त विभागाने दिनांक ८ जुलै, २०१९ च्या परिपत्रकान्वये सन २०१९-२० करीता माहे डिसेंबर अखेर आवश्यक असणारा अनिवार्य खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतूदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत अर्थसंकल्पीय प्रणालीवर उपलब्ध करुन दिला आहे. सदर तरतुदीपैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला माहे एप्रिल, २०१९ ते जुलै, २०१९ या चार महिन्यांकरीता एकूण ७५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर कोटी फक्त) इतका निधी वाचा मधील अनुक्रमांक ५ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत माहे एप्रिल ते जुलै, २०१९ या चार महिन्यात केलेला प्रत्यक्ष खर्च विचारात घेऊन प्राधिकरणाला उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत माहे ऑगस्ट, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या पाच महिन्यांकरीता प्राधिकरणातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना निवृत्तीवेतन अनुदान वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग झालेल्या शासकीय कर्मचा-यांना निवृत्तीवेतनाचे लाभ मंजूर करण्यासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये “मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता १९९, इतर अशासकीय संस्थांना सहाय्य (०१) इतर अशासकीय संस्थांना सहाय्य (०१)(०१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग झालेल्या शासकीय कर्मचा-यांना निवृत्तीवेतनाचे लाभ मंजूर करण्यासाठी सहायक अनुदान (अनिवार्य) (२२१५ A०५२) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षाखाली रुपये ७७,०५,८०,०००/-(अक्षरी रुपये सत्याहत्तर कोटी पाच लाख ऐंशी हजार फक्त) एवढे अनुदान माहे ऑगस्ट, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या पाच महिन्यांकरीता खालील अटींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.

अ) या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारे अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतन लाभांसाठी मंजूर असल्याने या अनुदानामधील रकमेचा खर्च त्याच कामांसाठी होईल याची दक्षता सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी घ्यावी.

आ) दिनांक २३.३.२०१७ पूर्वीच्या थकबाकीसाठी या निधीचा वापर करु नये. या निधीचा अन्य बाबींवरील खर्च (विनियोग) ही वित्तीय अनियमितता समजण्यात येईल व अशा कृतीसाठी संबंधित अधिकारी/कर्मचारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहतील.

इ) मुक्त अनुदानाच्या रकमेचे स्वतंत्र लेखे ठेवण्यात यावेत.

ई) मुक्त अनुदानातून होणा-या वाटपाची माहिती प्राधिकरणाने वेळोवेळी शासनास कळवावी.

उ) मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील जोडपत्र २ मधील नियम क्रमांक ३ नुसार प्राधिकरणाचे लेखे संबंधित कागदपत्रांसह निरीक्षणाकरिता प्राधिकरणाने सादर करावेत.

ऊ) प्राधिकरणाने मुक्त अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनाला सादर करावे. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी उपयोगिता प्रमाणपत्रात दर्शविलेल्या मंजूर व मुक्त अनुदानाच्या रकमा तसेच खर्चाच्या रकमा प्रमाणित कराव्यात. त्या उपयोगिता प्रमाणपत्रांवर सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी प्रतिस्वाक्षरी करावी. अशी उपयोगिता प्रमाणपत्रेच शासनाला स्विकारार्ह होतील.

ऋ) मुक्त केलेल्या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा आणि विहित अहवाल, विहित दिनांकास लेखा अधिकारी, पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडे सादर करावा.

२. या शासन निर्णयान्वये वितरीत केलेले अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे संचालक (वित्त), श्री.य.बा.पाटील, यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून तर श्री.रा.म.गेंगजे, उप सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. शासनाद्वारे देण्यात येणारे निवृत्तीवेतन अनुदान लाभार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये ECS द्वारे प्रदान करणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत निवृत्तीवेतन अनुदानाची रक्कम एकत्रितरित्या व Offline पद्धतीने वितरीत करण्यात येऊ नये.

४. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च “मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता १९९, इतर अशासकीय संस्थांना सहाय्य, (०१) इतर अशासकीय संस्थांना सहाय्य, (०१)(०१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग झालेल्या शासकीय कर्मचा-यांना निवृत्तीवेतनाचे लाभ मंजूर करण्यासाठी सहायक अनुदान (अनिवार्य) (२२१५ A०५२) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून सन २०१९-२० मधील वित्तीय लेख्यात समाविष्ट करावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक १ एप्रिल,२०१९ व शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक

८ जुलै, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना दिलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे. या परिपत्रकान्वये नमूद केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता होत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१९१५५१०४५२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chetan Balasaheb Nikam

Digitally signed by Chetan Balasaheb Nikam
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, serialNumber=7268de40660971f80951c66d0e657e903b378196f51a978d2a366cf5eb564c0c, cn=Chetan Balasaheb Nikam
Date: 2019.08.20 12:24:39 +05'30'

चेतन निकम
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विधानसभा / विधान परिषद सदस्य, सर्व
२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
३. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
९. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, वांद्रे, मुंबई
१०. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, (व्यय-३ व अर्थसंकल्प-१८)
११. कार्यासन पापु-०४ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१२. निवड नस्ती कार्यासन पापु-२३